**MHAH220000182026**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.९/२०२६ मधील नि.क्र.१ खालील आदेश**

[ दिनांक २१.०१.२०२६]

**शाकिब अली कुरेशी वि. सरकार**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार शाकिब अली कुरेशी याने भारतीय नागरीक सुरक्षा कायदा २०२३ चे कलम ५०३ अन्वये जप्त वाहनाचा अंतरिम ताबा मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार हा शेती व्यवसाय करुन स्वतःची व कुटुंबाची उपजिवीका भागवतो. त्याने वाहतुक व्यवसाय करण्याकरीता महिंद्रा ॲन्ड महिंद्रा लिमीटेड या कंपनीचे Bolero Camper SC 4WD BSIII वाहन खरेदी केलेले असून सदर वाहनाचा नोंदणी क्र. MH–42–M–4046, चॅसीस नंबर MA1ZN2GHKC1H58496, इंजिन नंबर GHC1H36255 व रंग WHITE आहे. अर्जदाराचे मालकीचे सदर वाहन पोलीस स्टेशन, कर्जत येथे गु.र.नं.७०७/२०२५ प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा १९६० चे कलम ३/११ अन्वये आणि महाराष्ट्र पशु संरक्षण कायदा १९७६ चे कलम ५(ए) (बी) चे उल्लंघनाबाबत कलम ९ अन्वये दाखल गुन्हयाच्या कामी जप्त करण्यात आलेले आहे. सदरकामी कर्जत पोलिस स्टेशनचे अधिकारी यांनी सदरचे वाहन जप्त करुन कर्जत पोलिस स्टेशन येथे ठेवलेले आहे. सदर वाहन पो.ठाण्यात पडून राहिल्यास त्याचे पार्ट खराब होणार आहेत. सदर वाहन वापरात न राहिल्यास त्यामध्ये बिघाड होणार आहे. सदर वाहन हे दैनंदिन वापरासाठी गरजेचे असून न्यायालय सांगेल त्या अटी व शर्तीचे पालन करण्यास ते तयार आहे. सबब सदरील वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यासाठी त्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. तपासी अधिकारी यांनी म्हणणे नि.क्र.६ लगत दाखल करुन सदर जप्त वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देण्यास हरकत घेतली आहे. जप्त गोवंश जातीचे जनावरे हे गोशाळा येथे जमा करण्यात आली आहेत. जप्त मुद्देमाल हा पोलीस स्टेशन मुद्देमाल कारकुन यांचेकडे जमा करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील साक्षीदार यांचे जाब जबाब नोंदविणे बाकी आहेत. सदर पिकअपच्या मुळ मालकाने किंवा अर्जदाराने कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे हजर केले नाहीत. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल की, सदरचे वाहनास प्राणी वाहतुकीचा वैध परवाना नाही. तसेच सदर वाहनात प्राण्यांवर अमानुष व क्रुर वागणूक देऊन अवैध पशुवाहतूक केलेली आहे. तसेच सदरचे वाहन परत केल्यास वाहनाचे मालकीत अगर बाह्य स्वरुपात अर्जदार बदल करु शकतो. तसेच पुराव्यावेळी मे. न्यायालयात महत्वाचा पुरावा उपलब्ध राहणार नाही. सदर वाहन सोडल्यास पुन्हा याच स्वरुपाचा गुन्हयात सदर वाहनाचा वापर करु शकतो. सबब, सदर अर्ज नामंजुर करणेत यावा, अशी हरकत घेतलेली आहे.

५. अर्जदाराने त्याच्या कथनांच्या पृष्ठ्यर्थ पोलिस स्टेशन, कर्जत येथे दाखल गु.र.नं.७०७/२०२५ ची एफ.आय.आर. ची छायांकित प्रत (नि.क्र.३/१), सदर वाहनाच्या तपशीलाची संगणकीय प्रत (नि.क्र.३/२) व अर्जदाराचे स्वतःचे आधारकार्डची पडताळणी प्रत (नि.क्र.३/३) ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

६. सदरील वाहन उपरोक्त गुन्ह्यात पोलीसांनी जप्त केलेले आहे, ही बाब विवादीत नाही. अर्जदाराच्या कथनानुसार तो जप्त वाहनाचा मालक आहे. सदर कथनाचे पुष्ठ्यर्थ त्याने सदर गुन्ह्यातील वाहनाच्या तपशीलाची प्रत दाखल केलेली आहे. त्यात नमूद वाहनाचे वर्णन अर्जदाराने अर्जात केलेल्या वर्णनाशी सुसंगत आहे.

तसेच सदर वर्णनाचे वाहन पोलीसांनी गुन्ह्यात जप्त केलेले आहे, ही बाब विवादीत नाही. अर्जदाराने वादपटलावर दाखल केलेल्या नोंदणी पत्रातील मजकुरावरुन सदर वाहनाचा मालक अर्जदार स्वतः असल्याचे दिसते. सदरकामी अभियोक्ता व तपासी अधिकारी यांच्या जबाबावरुन त्यांनी अर्जदार सदर जप्त वाहनाचा मालक असल्याचे स्पष्ट नाकारलेले नाही. तसेच अर्जदाराच्या वतीने दाखल केलेल्या वाहनाच्या तपशीलाच्या प्रतीचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी अर्जदार हा सदर जप्त वाहनाचा मालक असल्याचे दिसून येते.

७. प्रस्तुत गुन्हयातील वादपटलावर दाखल प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले. असता दिसून येते की, सदरचा गुन्हा प्रल्हाद सोमनाथ पवार रा. अरणगाव, ता.जामखेड, जि. अहिल्यानगर, बबलु शखील पठाण व हिम्मत उर्फ तौफिक शफिक शेख दोघे राहणार खडकत, ता.आष्टी, जि.बीड यांच्या विरुध्द सदर जप्त वाहनातून एकूण तीन जर्शी गाई व जर्शी गाईची दोन वासरे अशा एकूण पाच जनावरांची अवैधरित्या वाहतूक करताना मिळून आले म्हणून दाखल करण्यात आलेला आहे. सदर वाहनाचा चालक प्रल्हाद सोमनाथ पवार हा होता. तसेच सदर जप्त वाहनातील जनावरे ही बबलु शखील पठाण व हिम्मत उर्फ तौफिक शफिक शेख यांच्या मालकीची असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. प्रस्तुत अर्जात अर्जदाराने जनावरांच्या ताब्याबाबत मागणी केलेली नाही.

८. सहा.सरकारी अभियोक्ता यांनी सदर वाहनाचा वापर तशाच प्रकारच्या गुन्ह्यात होण्याची शक्यता असल्याचे कथन केले आहे. सद्य स्थितीत तपासी अधिकारी यास तपासाकामी सदर वाहनाची आवश्यकता असल्याचे सकृतदर्शनी दिसत नाही. सदर वाहन जर अनिश्चित कालावधीसाठी पोलीस ठाणे येथे पडुन राहिले तर त्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सकृतदर्शनी सदर वाहनाचे पोलिसांना तपासाकामी आवश्यकता असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे मा. सर्वोच्च

न्यायालयाच्या ***सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य*** या न्याय निवाड्यातील निर्देशानुसार, तपासकामी सहकार्य करणे व वेळोवेळी सदरील वाहन पोलीसांच्या तपासात हजर करणे अशी अट घालून सदर वाहन परत करण्यास कोणतीही बाधा नाही असे दिसते. अर्जदाराने जप्त वाहन अंतरिम आदेशानुसार त्याच्या ताब्यात देण्याइतपत कागदपत्रे न्यायालयात दाखल केली आहेत. वरील विवेचनाआधारे अर्जदाराचा प्रस्तूत अर्ज योग्य त्या अटींवर मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार शाकिब अली कुरेशी यास पोलीस स्टेशन, कर्जत गु.र.नं. ७०७/२०२५ चे गुन्हयातील जप्त वाहन महिंद्रा ॲन्ड महिंद्रा लिमीटेड वाहनाचा नोंदणी क्र. MH-42-M-4046, चॅसीस नंबर MA1ZN2GHKC1H58496, इंजिन नंबर GHC1H36255 व रंग WHITE या वाहनाचा अंतरीम ताबा पुढील अटींवर देण्यात येत आहे.

अ) अर्जदाराने रक्कम रू.४,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख रु.फक्त) चे वाहन निरक्षणग्राही बंधपत्र द्यावे.

ब) अर्जदाराने मुळ प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत न्यायालयाच्या पूर्व परवानगीशिवाय सदर वाहनाच्या मुळ स्वरूप, रंग यात बदल करावयाचा नाही. तसेच सदर वाहन अन्य कोणासही हस्तांतरीत अथवा तबदिल करावयाचे नाही.

क) अर्जदाराने सदर वाहनाचा वापर अर्जात नमूद प्रकारच्या गुन्हयांमध्ये करायचा नाही, तसेच न्यायालय अथवा तपासी अधिकारी निर्देश करतील त्याप्रमाणे हजर ठेवण्याचे आहे.

३. तपासी अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदाराचे ताब्यात देतेवेळी सदर वाहनाचा नोंदणीकृत नंबर, चेसीस नंबर व इंजीन नंबरचा दर्शनी भाग दिसावा असे फोटो काढून फोटोवर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी व पंचनामा करावा. सदर पंचनामा व फोटो बंधपत्रासोबत तपासी अंमलदार यांनी न्यायालयात दाखल करावे.

४. अर्जदाराने बंधपत्र तपासी अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करावे. अर्जदाराने तपासी अधिकारी यांना सहकार्य करावे.

५. येणेप्रमाणे यादी देण्यात यावी.

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.01.21 17:58:27 +0530

कर्जत. (एस.एन.थापेकर)

ता.२१/०१/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र.१),कर्जत.